# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.11.2024** **वारःमंगळवार**

---

1. कॅनडामध्ये हिंदू सभा मंदिरात फुटीरतावाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून तीव्र शब्दांत निषेध
2. अमेरिकेच्या 47व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान
3. महाराष्ट्रात 288 विधानसभा मतदारसंघात 4140 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात; तर झारखंडमध्ये निवडणूक प्रचाराची रणधुमाळी आणि
4. एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म प्रकारात नामांकन

**<u>हिंसाचार</u>**

कॅनडामध्ये काल ओंटारियो इथं ब्रॅम्प्टनमधल्या हिंदू सभा मंदिरात दहशतवादी आणि फुटीरतावाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अशा हल्ल्याद्वारे कॅनडातील भारतीय राजनैतिक अधिकाऱ्याना घाबरवण्याचा प्रयत्न करणे हा भ्याडपणा आहे. अशा घटनांमुळे भारताचा संकल्प अजिबात ढळणार नाही. असं त्यांनी समाज माध्यमाद्वारे प्रसिद्ध केलेल्या आपल्या संदेशात म्हटल आहे. कॅनडा सरकारने देशात कायदा सुव्यवस्था राहील याची काळजी घ्यावी आणि या हल्ल्याबाबत योग्य कारवाई करावी असही पंतप्रधान मोदी यांनी म्हंटल आहे. दरम्यान, कॅनडामधल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. सर्व प्रार्थनास्थळे अशा हल्ल्यांपासून सुरक्षित राहतील, हिंसाचार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, अशी भारताची अपेक्षा आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी कॅनडा सरकारला दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. व्हँकुव्हर आणि सरे इथंही 2 आणि 3 नोव्हेंबरला अशाच प्रकारच्या सभांमध्ये हिंसाचार झाला होता.

**<u>राष्ट्रपती</u>**

नवी दिल्लीत आजपासून सुरू होणाऱ्या पहिल्या आशियाई बौद्ध संमेलनात राष्ट्रपती द्रौपदी मुरमू सहभागी होणार आहेत. या संमेलनात आशियातील बौद्ध धर्माचे अनुयायी आणि अभ्यासक सहभागी होत असून त्यात बौद्ध परांपरेविषयी सर्वंकष विचार विनिमय करण्यात येणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघ यांनी या संमेलनाच आयोजन केल असून, आशियाई देशांना मजबूत करण्यासाठी बौद्ध धर्माची भूमिका ही यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**अमेरिका निवडणूक**

अमेरिकेच्या 47व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या कमला हॅरिस यांच्यात लढत होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज संध्याकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत मतदानाला सुरुवात होईल; तर उद्या सकाळी साडेसात ते साडे नऊ यावेळेत ते संपेल. या दोघांनीही निवडणुकीत निर्णायक ठरणाऱ्या राज्यांमध्ये जोरदार प्रचार केला आहे. टपाली मतदानाने अनेकांनी आपलं मत आधीच नोंदवलं आहे. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षची निवड अप्रत्यक्ष निवडणूक प्रणाली द्वारे होते, त्याला इलेक्टोरल कॉलेज अस म्हणतात. ही निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवाराला 538 पैकी 270 इलेक्टोरल कॉलेज मतांची आवश्यकता असते. या निवडणुकीची मतमोजणी 6 जानेवारीला अमेरिकेच्या संयुक्त संसद अधिवेशनात होणार असून, तेव्हाच विजयी उमेदवाराची घोषणा करण्यात येईल. अमेरिकेच्या नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाळ 20 जानेवारीपासून सुरू होत असून तो चार वर्षाचा असेल.

**पर्यटन प्रदर्शन**

लंडन एक्ससेल इथ आजपासून सुरू होणाऱ्या जागतिक पर्यटन बाजार प्रदर्शनात भारतीय पर्यटन मंत्रालाय सहभागी होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या पर्यटन महोत्सवात भारतातील विविध राज्यांच्या पर्यटन विभागाचे प्रतिनिधी, विमान कंपन्या आणि पर्यटन व्यवसायातील कंपन्यांचे प्रतिनिधी मिळून एकंदर 50 जणांचं भारतीय प्रतिनिधि मंडळ सहभागी होत आहे. या प्रदर्शनातील भारतीय विभागात भारतीय संस्कृति, परंपरा यांच दर्शन घडवण्यात येणार आहे. विवाह पर्यटन, परिषदा आणि बैठका यासाठीचे आयोजन आणि महाकुंभ मेळा या दृष्टीने भारताला जागतिक पर्यटन केंद्र म्हणून जगासमोर आणणे हे या वर्षीच्या महोत्सवात भारतीय पर्यटन विभागाचं उद्दिष्ट आहे.

**FTII**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या Sunflowers Were the First Ones to Know या लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म या प्रकारात नामांकन मिळालं आहे. चिदानंद नायक याचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटानं यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात 'ला सिनेफ' विभागात प्रथम पुरस्कार पटकावला होता. ऑस्कर नामांकन जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना लघुपटचा दिग्दर्शक चिदानंद नायक म्हणाला....

**उमेदवारी माघार**

महाराष्ट्रात 20 नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीचं चित्र स्पष्ट झालं आहे. यंदा विधानसभा निवडणुकीसाठी 4 हजार 140 उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातल्या 288 मतदारसंघात 7 हजार 78 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते; उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत 2 हजार 938 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. अनेक मतदार संघातली बंडखोरी रोखण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आलं आहे; त्याचवेळी अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवारां नी आपले अर्ज कायम ठेवल्याने तिथे चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे.

**<u>झारखंड प्रचार</u>**

झारखंड मध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला जोर आलं असून विविध पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. हेमंत सोरेन सरकारनं झारखंड मधल्या लोकांची फसवणूक केली असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल झारखंड मधल्या गढवा इथं केली. ते आसामचे मुख्यमंत्री आणि भाजपचे झारखंड चे प्रभारी हेमंत बिसवा सरमा यांनी मतांसाठी मुख्यमंत्री हेमंत सोरेन बांग्लादेशी घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप केला. तर मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी 2019 मध्ये भाजपने आपल्या सरकार विरुद्ध कट रचल्याचा आरोप केला. दरम्यान आज रांची आणि लोहरदग्गा इथ संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची प्रचार सभा होणार आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याही प्रचार सभा होणार आहेत.

**<u>रश्मी शुक्ला</u>**

महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं काल दिले. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर आयोगानं ही कारवाई केली आहे. त्यानंतर पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावं पाठवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत.

**<u>छट पूजा</u>**

उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात साजऱ्या होणाऱ्या सूर्य नारायणच्या छट पूजेच महापर्व आजपासून सुरू होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या उत्सवात आज नहाय खाय हा पूजा विधी, उद्या खरना विधी, गुरुवारी संध्याकाळी सूर्यास्त पूजा तर शुक्रवारी पहाटे सुर्योदयाला पूजा आणि सूर्याला अर्घ्य अर्पण करून या महापर्वाची सांगता होईल. दरम्यान सणासुदीच्या काळात प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन रेल्वेनं दिल्लीतून देशाच्या विविध भागात जाण्यासाठी 22 विशेष रेल्वे गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>टेनिस</u>**

चीन मधल्या जिंगशान इथ सुरू असलेल्या जागतिक सॉफ्ट टेनिस अजिंक्य पद स्पर्धेत 21 वर्षाखालील महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात भारताच्या तनुश्री पांडे हिने रौप्य पदक पटकावल आहे. चीनच्या सीयंग मीन यू हिच्या बरोबर तिचा सामना झाला, त्यात तिला 3-4 गुणाने पराभव पत्करावा लागला, त्यामुळे ती रौप्य पदकाची मानकरी ठरली.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.